केवळ गाळ काढू नका, मुंबईला पूरस्थितीपासून वाचवा, अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांचे आदेश

मुंबई, दि. ०९ (प्रतिनिधी): पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून नदी नाल्यांमधील केवळ गाळ उपसण्याचे काम नको, तर गाळ उपसण्याच्या पलीकडे जाऊन पावसाळ्यातील संभाव्य पूरस्थिती रोखणे, हा नाले स्वच्छता करण्याचा प्राधान्याने उद्देश असावा, असे आदेश महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी पालिकेच्या यंत्रणेला दिले. प्रचलित कार्यपद्धतीमध्ये योग्य ती सुधारणा करावी. सर्व संबंधित अभियंत्यांनी फक्त कार्यालयात बसून आढावा न घेता प्रत्यक्ष कार्यस्थळी दररोज उपस्थित राहून गाळ उपसा कामांवर योग्य देखरेख करावी, अशा स्पष्ट सूचनाही बांगर यांनी दिल्या.

मुंबईतील पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून नदी-नाल्यांमधून गाळ काढण्याची कामे दरवर्षाप्रमाणे सुरू आहेत. पूर्व उपनगरांमधील प्रमुख नाल्यांमधून गाळ काढण्याच्या कामांची तसेच मिठी नदीतील गाळ काढण्याच्या कामांची अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी गुरुवारी पाहणी केली. त्यावेळी त्यांनी संबंधितांना आदेश दिले. या दौऱ्याप्रसंगी उप आयुक्त शशांक भोरे, प्रमुख अभियंताश्रीधर चौधरी यांच्यासह संबंधित अधिकारी, अभियंते उपस्थित होते.

या दौऱ्यात घाटकोपर (पूर्व) येथे छेडा नगर जंक्शनजवळ सोमय्या नाला, कुर्ला स्थित माहूल खाडी नाला, शिवडी-चेंबूर रस्त्यावर माहूल खाडी नाला, वडाळा येथे रावळी निम्नस्तर नाला, कुर्ला (पूर्व) येथील नेहरूनगर नाला, धारावी टी जंक्शन येथे दादर-धारावी नाला इत्यादी ठिकाणी बांगर यांनी भेट दिली. तसेच वांद्रे कुर्ला संकुल परिसरात भेट देवून मिठी नदीतून गाळ काढण्याच्या कामांची पाहणी केली.

सर्व प्रमुख नाल्यांच्या बाबतीत गाळ उपसण्याचे नालेनिहाय आणि दिवसनिहाय नियोजन करावे, विभाग कार्यालये व संबंधित यंत्रणांशी समन्वय राखावा. लहान नाले व मोठे नाले यांचे प्रवाह परस्परांवर परिणाम करतात. त्यामुळे प्रसंगी आपल्या कार्यक्षेत्रापलीकडे जावून सर्व नाले स्वच्छ झाल्याची खातरजमा करावी, अशा सूचनाही बांगर यांनी दिल्या.प्रमुख नाल्यांसह, मिठी नदीतून गाळ उपसा करण्याच्या कामाची वांद्रे-कुर्ला संकुल परिसरात भेट देवून बांगर यांनी पाहणी केली. एमएमआरडीए कार्यालय आणि धीरूभाई अंबानी शाळेलगत अशा दोन ठिकाणी भेट देऊन बांगर यांनी संपूर्ण पाहणी केली.

गाळ काढण्याच्या प्रत्येक सत्राचा अभिलेख नोंदवावा. येत्या ५१ दिवसांत म्हणजे दिनांक ३१ मे २०२५ पर्यंत गाळ काढण्याचे काम पूर्ण होण्यासाठी अतिशय दक्ष राहून पर्यवेक्षण करावे, कामाची गुणवत्ता व पारदर्शकता राहण्यासाठी गाळ उपसा कामांशी सर्व संबंधित अभियंत्यांनी फक्त कार्यालयात थांबून कामांचा आढावा घेऊ नये, तर गाळ काढण्याच्या कालावधीत प्रत्यक्ष कार्यस्थळी उपस्थित राहून कामांवर योग्य देखरेख करणे अनिवार्य असेल.

नवी मुंबई महापालिकेची डिजिटल सेवांकडे पाऊले; नागरिकांना घर बसल्या दाखले मिळणार

नवी मुंबई, दि. ०९ (वार्ताहर) : नवी मुंबईतील नागरिकांना सर्व सोयी सुविधा सुलभपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी महापालिका आग्रही असल्याचे दिसून येत आहे. जन्म, मृत्यू आणि विवाह नोंदणीसाठीची प्रक्रिया अधिक अद्ययावत करण्याचे निर्देश आयुक्त कैलास शिंदे यांनी दिले असून या सेवा आता डिजीटल स्वरूपात घरबसल्या उपलब्ध होणार आहेत. मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतील १०० दिवसांचा सात कलमी कृती आराखडा राबवत असताना सेवासुविधांची लोकाभिमुख सुलभता आणि गतीमानता यावर नवी मुंबई महापालिकेच्यावतीने भर दिला जात आहे. या कृती आराखड्यांतर्गत मुख्यालय, विभागीय कार्यालये, शाळा, रुग्णालये अशा विविध ठिकाणी कामे सुरू आहेत. तसेच विविध कार्यालयातील कार्यप्रणाली अधिक गतीमान सुधारणा व्हावी या उद्देशाने सकारात्मक पाऊले उचलली जात आहेत.

याच अंतर्गत आयुक्त डॉ कैलास शिंदे यांनी कोपरखैरणे विभाग कार्यालयाला भेट देऊन कार्यालयीन व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी त्यांनी जन्म-मृत्यू नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ करून, नागरिकांना घरूनच नोंदणी करता यावी आणि प्रमाणपत्रे ऑनलाईन स्वरूपात मिळावीत, यासाठी विद्यमान प्रणालीत आवश्यक तांत्रिक सुधारणा करण्याचे आदेश दिले. त्याचप्रमाणे विवाह नोंदणी प्रक्रिया सुलभतेवर विशेष भर देण्यात यावा असेही सांगितले. ऑनलाईन अर्ज करणे, डिजीटल कागदपत्रे समाविष्ट करणे आणि उपस्थित राहण्यासाठी दूरध्वनी संदेशाद्वारे सूचित करण्याची प्रणाली लागू करण्याचे आदेशही देण्यात आले. तसेच ही सेवा नागरिक स्वतः किंवा सेतू केंद्राच्या माध्यमातून करू शकणार आहेत. त्याचप्रमाणे कोपरखैरणे कार्यालयात स्वच्छता आणि अभिलेख व्यवस्थापनाबाबतही आयुक्तांनी सूचनांचे पालन करण्याचे निर्देश दिले.

मुंबई-मांडवा १००० रुपये; गेटवे ऑफ इंडिया येथील तिकिटांच्या दरात मनमानी वाढ

मुंबई, दि. ०९ (प्रतिनिधी) : मुंबई – मांडवा अंतर बोटीने पार करण्यासाठी १०० ते ३०० रुपये तिकिट दर आकारले जात असताना आता गेट वे ऑफ इंडिया येथील जेट्टी क्रमांक ५ वर मात्र प्रवाशांकडून याच प्रवासासाठी एक हजार रुपये घेतले जात आहेत. भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी ही बाब उघडकीस आणली असून राज्य सरकारने या प्रकरणाची चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

गेटवे ऑफ इंडिया येथील जेट्टी क्रमांक ५ वर प्रवासी व पर्यटकांची लूट सुरू असल्याचा आरोप भाजपचे कुलाबा येथील माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी केला आहे. प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा पैसे उकळले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच याप्रकरणी राज्य सरकार आणि मुंबई पोर्ट ट्रस्टला (एमबीपीटी) पत्र पाठवून गेटवे येथील जेट्टी क्रमांक ५ वरील कामकाजाची, तसेच एमबीपीटी आणि मांडवा एलएलपी यांच्यामधील करारातील अटींची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. स्पीड बोट सेवांसाठी अवाजवी शुल्क आकारले जात असल्याच्या असंख्य तक्रारी आपल्याला प्राप्त झाल्या आहेत. गेट वे ऑफ इंडियावरून मांडवाला जाण्यासाठी प्रति व्यक्ती एक हजार रुपये शुल्क आकारले जात आहे. गेट वे ऑफ इंडिया येथील इतर जेटीवरून त्याच प्रवासासाठी सुमारे १०० ते ३०० रुपये दर आकारतात. त्यामुळे हे तिकिट दर खूपच अवाजवी असल्याची तक्रार करण्यात येत आहे. तसेच या जेट्टीवर तिकीट दर कुठेही पारदर्शकपणे जाहीर केलेले नाहीत. प्रवास करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला प्रत्यक्ष जागेवरच तिकीट खरेदी करावे लागते, असाही आरोप मकरंद नार्वेकर यांनी पत्रात केला आहे. नार्वेकर पुढे म्हणाले की मुंबई पोर्ट ट्रस्टने मांडवा एलएलपीबरोबर करार केला असल्याचे समजते. या कंपनीची सरकारी देणी प्रलंबित आहेत. त्यांच्याशी करार करण्याऐवजी या कंपनीला काळ्या यादीत टाकायला हवे, अशीही मागणी नार्वेकर यांनी केली आहे.

मुंबई – मांडवा असा प्रवास करणारे हजारो प्रवासी आहेत. मांडवा येथून अलिबाग जवळ आहे. त्यामुळे गेट वे ऑफ इंडियावरून बोटीने अलिबागला जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. अलिबाग आणि आसपासच्या परिसरात वास्तव्यास असलेले आणि मुंबईत नोकरी करणारे अनेक नागरिकही गेट वे ऑफ इंडियावरून बोटीने मांडव्याला जातात. तसेच मांडवा येथून अलिबाग, मुरुड अशी पर्यटनस्थळे असल्यामुळे पर्यटकही मोठ्या संख्येने जलप्रवासाला पसंती देतात.

Hero FINCORP — हिरो फाईनकॉर्प लिमिटेड

सीआयएन : U74899DL1991PLC046774
नोंदणीकृत कार्यालय : ३४, कम्युनिटी सेंटर, बसंत लोक, वसंत विहार, नवी दिल्ली – ११० ०५७
दूर. क्र. : ०११-४९४८ ७१५०, फॅक्स : ०११-४९४८७१५०
ई-मेल : litigation@herofincorp.com वेबसाइट : www.herofincorp.com

ताबा सूचना (परिशिष्ट ४) नियम ८(१)

१. ज्याअर्थी, **हिरो फाईनकॉर्प लिमिटेड (एचएफसीएल),** नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी सीक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँन्ड एन्फोर्समेट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, २००२ (५४/२००२) (यापुढे सदर कायदा म्हणून संदर्भित) अनुसार व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचिता अनुच्छेद १३ (२) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये खालील **अनुसार दि. ३०.०१.२०२५ रोजी मागणी सूचना** जारी केली आहे :

१. **डॉ. प्रमोद यशवंत गुरव (कर्जदार/ पत्ता क्र. १) राहणार : एच-१,** ए/७३, श्रीरंग सोसायटी, शिव सेना शाखाच्या मागे, ठाणे पश्चिम ४०० ६०१ (महाराष्ट्र) तसेच : पहिला मजला, गोवर्धन धाम, आकृती समोर, एसएमएल जुना अविरा आरपी रोड, ठाणे पश्चिम, महाराष्ट्र ४०० ६०१.

२. **श्री. अरूंधती प्रमोद गुरव (सह-कर्जदार/ पत्ता क्र. २) राहणार एच-१,** ए/७३, श्रीरंग सोसायटी, शिव सेना शाखाच्या मागे, ठाणे पश्चिम ४०० ६०१

३. **श्री. अर्जिक्य गुरव (सह-कर्जदार/ पत्ता क्र. ३) राहणार पत्ता : एच-१,** ए/७३, श्रीरंग सोसायटी, शिव सेना शाखाच्या मागे, ठाणे पश्चिम ४०० ६०१

४. **मे. लक्सक्राफ्ट हेल्थकेअर प्रा. लि. (सह-कर्जदार/ पत्ता क्र. ४) त्यांचे नोंदणीकृत कार्यालय : एच-१,** ए/७३, श्रीरंग, ठाणे पश्चिम ४०० ६०१

यांना खालील निर्देशित रक्कम **रु. १,३३,१३,८४४.६५/- (रु. एक करोड तेहत्तीस लाख तेरा हजार आठशे चव्वेचाळीस व पासष्ट पैसे मात्र) दि. २४.०१.२०२५** अनुसार त्यावरील लागू व्याज व अन्य प्रभार या रकमेचे प्रदान सदर सूचनेच्या तारखेपासून साठ (६०) दिवसांच्या आत भरणा करण्याकरिता जारी केली होती.

कर्जदारांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना याद्वारे विशेषत: कर्जदारांना व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेट) नियम, २००२ च्या नियमन ८ सहवाचिता अनुच्छेद १३ च्या उप-अनुच्छेद (४) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा **दि. ०८.०४.२०२५** रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदारांना व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे एचएफसीएल यांच्या रक्कम **रु. १,३३,१३,८४४.६५/- (रु. एक करोड तेहत्तीस लाख तेरा हजार आठशे चव्वेचाळीस व पासष्ट पैसे मात्र) दि. २४.०१.२०२५** अनुसार त्यावरील लागू व्याज व अन्य प्रभार रकमेच्या अधीन असतील.

कायद्याचे अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद (८) च्या तरतुदीअंतर्गत उपलब्ध कालावधीमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

स्थावर मालमत्तेचे विवरण खालीलप्रमाणे :

मालमत्ता – १ : सर्व तो भाग व भूखंड असलेली मालमत्ता : जागा क्र.२ए, तळ मजला, मोजमापित १८५ चौ. फूट सुवरत अपार्टमेंट्स, सुवरत सीएचएसएल, प्लॉट जमिन धारक टिका क्र. १०, सीटीएस क्र. ४०, ४१, ४२, ४३ (ई), ४४ व ४५, गाव टेंभी नाका, टेंभी नाका भवानी चौकजवळ, ठाणे ४०० ६०१ व **सीमा : उत्तरेस :** जैन मंदिर, **दक्षिणेस :** एडुजी रोड, **पूर्वेस :** मालमत्ता धारक सि. क्र. ३६, **पश्चिमेस :** अगीयारी लेन.

मालमत्ता २ सर्व तो भाग व भूखंड : फ्लॅट क्र. ७३, ७ वा मजला, मोजमापित ७५० चौ. फूट बिल्ट अप क्षेत्रफळ, ए विंग, एच१ बिल्डींग, श्रीरंग युनिट क्र. २४ सहकारी गृह निर्माण संस्था लि., गाव माजीवाडे, ठाणे.

ठिकाण : ठाणे
दिनांक : ०८.०४.२०२५

सही/- प्राधिकृत अधिकारी
हिरो फाईनकॉर्प लिमिटेड

मध्य रेल्वे

सोलापूर विभाग

निविदा सूचना

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने व त्यांच्याकरिता खालील कामांकरिता नामांकित संस्था/ कंत्राटदार यांच्याकडून ई-निविदा मागवीत आहेत.

निविदा सूचना क्र.	कामाचे विवरण	कमाचे अंदाजित मूल्य	इसारा रक्कम	कामाचे कार्यपूर्तता कालावधी	देखभाल कालावधी
०७-२०२५-वरिष्ठ डीईएनएस	दोन वर्ष कालावधीकरिता एसएसई/पी. वे/यूएसएफडी/एसयूआर अंतर्गत यूएसएफडी खुली लाईन टीम यांच्यासह कार्यरत केलेल्या सेवांचे रेंडरिंग.	रु. ४,१६,८३,९३१.५०	रु. ३,५८,४००.००	२४ महिने	शून्य
वेबसाइट www.ireps.gov.in वर कोट निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख व वेळ		दि. ०५.०५.२०२५ रोजी ३.०० पर्यंत.			
वेबसाइट www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख व वेळ		दि. ०५.०५.२०२५ रोजी १५.३० वा.			

प्रस्तावित निविदाकारांनी कृपया निविदा बंद करण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला पुन्हा भेट द्यावी व सदर निविदेकरिता जारी सुधार/ शुद्धिपत्रक पाहावे.
वेबसाइट : www.ireps.gov.in

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर

SUN 66 अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

मध्य रेल्वे

सोलापूर विभाग

निविदा सूचना

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने व त्यांच्याकरिता खालील कामांकरिता नामांकित संस्था/ कंत्राटदार यांच्याकडून ई-निविदा मागवीत आहेत.

निविदा सूचना क्र.	कामाचे विवरण	कमाचे अंदाजित मूल्य	इसारा रक्कम	कामाचे कार्यपूर्तता कालावधी	देखभाल कालावधी
०८-२०२५-वरिष्ठ डीईएनएस	एक वर्ष कालावधीकरिता एडीईएन/पीव्हीआर व एडीईएन/एलयूआर सब डिव्हीजन अंतर्गत आरडीएसओ बेरिफाईड पॉट वेल्ड टेस्टर यांचा वापर करून मोबाईल एकवी प्लान्ट्स द्वारे अंमलात आणलेले एकवी वेल्डेड जॉईंट्स यांचे फेज्ड आरे अल्ट्रासोनिक टेस्टींग (पॉट).	रु. ४,४८,०५,९९२.४०	रु. ३,७४,०००.००	१२ महिने	शून्य
वेबसाइट www.ireps.gov.in वर कोट निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख व वेळ		दि. ०८.०५.२०२५ रोजी ३.०० पर्यंत.			
वेबसाइट www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख व वेळ		दि. ०८.०५.२०२५ रोजी १५.३० वा.			

प्रस्तावित निविदाकारांनी कृपया निविदा बंद करण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला पुन्हा भेट द्यावी व सदर निविदेकरिता जारी सुधार/ शुद्धिपत्रक पाहावे.
वेबसाइट www.ireps.gov.in

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कार्य), मध्य रेल्वे, सोलापूर

SUN 67 अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

पश्चिम रेल्वे उन्हाळी विशेष ट्रेन
वटवा ⇌ हुबली (व्हाया वसई रोड) दरम्यान चालवित आहे.

ट्रेन क्र.	गाडी सुटण्याचे ठिकाण व गंतव्य स्थानक	सेवांची तारीख	आगम	प्रस्थान
०७३३४	वाटवा – हुब्बळी	१४.०४.२०२५ ते १६.०६.२०२५	२१.४५ वा. (सोमवार)	१९.४५ वा. (पुढील दिवशी)
०७३३३	हुब्बळी – वाटवा	१३.०४.२०२५ ते १५.०४.२०२५	१९.३० वा. (रविवार)	१८.४५ वा. (पुढील दिवशी)

थांबा : आनंद, वडोदरा, सुरत, वापी, बोईसर, वसई रोड, कल्याण, लोणावळा, पुणे, सांगली, मिरज, कुडची, रायबाग, घाटप्रभा, गोकाक रोड, बेळगावी, लोंडा जंक्शन, अलनवार जंक्शन व धारवाड स्टेशन्स येथे दोन्ही दिशांना.

रचना : फर्स्ट एसी, एसी २-टायर, एसी ३-टायर, स्लीपर क्लास व सामान्य द्वितीय श्रेणी कोचेस.

विस्तृत माहिती संबंधात वेळ, थांबा व रचना यांच्याकरिता प्रवाश्यांनी कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्यावी.

ट्रेन क्र. ०७३३४ करिता बुकिंग दि. ११.०४.२०२५ रोजी खुली आहे व सर्व पीआरएस काउंटर्स वर व आयआरसीटीसी वेबसाइट वर उपलब्ध आहे. वरील ट्रेन विशेष प्रभारांवर विशेष ट्रेन चालविण्यात येईल.

पश्चिम रेल्वे
wr.indianrailways.gov.in
facebook.com/WesternRly
X.com/WesternRly
Instagram/WesternRly

सर्व आरक्षित तिकीटांकरिता कृपया मूळ आयडी पुरावा सोबत बाळगावा

सहा जणांच्या जमावाकडून विकलांग व्यक्तीला बेदम मारहाण

उल्हासनगर, दि. ०९ (वार्ताहर) : जुन्या वादातून पाच ते सहा जणांच्या जमावाना एकत्र येते एका विकलांग व्यक्तीला बेदम मारहाण केलीय. कुलदीप लबाना असं मारहाण करण्यात आलेल्याचं नाव आहे.

मारहाणीची सगळी घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झालीय. कुलदीप हा कॅम्प नंबर तीनच्या नाना गिरा चौक परिसरात पाया सूप ची हातगाडी लावतो. यावरून त्याला या ठिकाणी गाडी लावू नको असा दम देण्यात आला. शिवाय कुलदीप त्याच्या मुलाला शाळेत सोडायला गेलेला असताना तिथे त्याला मारहाण करण्यात आली आणि दोन दिवसात जर हातगाडी बंद केली नाही तर घरात घुसून मारू अशी धमकी देखील दिली. मात्र कुलदीप याने हातगाडी चालूच ठेवली याचा राग मनात धरून कुलदीप याचा घरात घुसून त्याला जमावाने बेदम मारहाण केली. याप्रकरणी पोलीस ठाण्यात कुलदीप याने तक्रार दिली असून पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्यांची नोंद केली आहे. मात्र आरोपींवर कठोर कारवाई करावी अशी कुलदीपची मागणी आहे.



ICICI Home Finance

कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०५९ भारत.
शाखा कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कं. लि., एफएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, जे. बी. नगर, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०५९.
शाखा कार्यालय : शुभजीवन आर्केड, कार्यालय क्र. ए-४०२, ४ था मजला, एस. व्ही. रोड, बोरिवली पश्चिम, मुंबई महाराष्ट्र ४०० ०९२.

(नियम ८(६) ची तरतूद पाहा)

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता सूचना

सीक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल असेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, २००२ व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ८(६) सहवाचन स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारे आम जनतेस विशेषत: कर्जदार व हमीदार यांना देण्यात येते की, खालील निर्देशित स्थावर मालमत्ता/ प्रभारित प्रतिभूत धनको यांना आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. यांच्या प्राधिकृत अधिकारी यांच्याद्वारे ताबा घेण्यात आलेल्या मालमत्तेची विक्री जशी आहे, जेथे आहे व जेथे कुठे आहे आधारावर व जेव्हा पण आधारावर खालील निर्देशित अनुसार करण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्जदार/ सह -कर्जदार/ हमीदार यांचे नाव/ कायदेशीर वारस, कर्ज खाते क्र.	प्रतिभूत मालमत्तेचा तपशील ज्ञात अडथळे, जर काही असल्यास	थकित रक्कम	राखीव मूल्य / इसारा रक्कम ठेव	मालमत्ता पडताळणी तारीख व वेळ	लिलावाची तारीख व वेळ	लिलाव तारखेपूर्वीं एक दिवस	सरफैसी चरण
ए	बी	सी	डी	ई	एफ	जी	एच	आय
१	सुधीर किशोर मासंद (कर्जदार) रश्मी किशोर मासंद (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएमयूएम०००००१२५३९८७/ एलएचएमयूएम०००००१२६७८२४	फ्लॅट क्र. ए/११०२, ११ वा मजला, बिल्डींग एव्हरशाईन कोस्मीक म्हणून ज्ञात एव्हरशाईन कोस्मीक को-ऑप. हा. सो. लि., इनफिनीटी मॉलजवळ, ऑफ न्यु लिंक रोड, अंधेरी, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई ४०० ०५३.	रु. २,८१, ९४,१२५/- ०७ एप्रिल, २०२५	रु. ३,९४, ०२,४५०/- रु. ३९,४०, २४५/-	०७ मे, २०२५ रोजी ११.०० ते ३.००	१४ मे, २०२५ रोजी २.०० ते ३.००	१३ मे, २०२५ रोजी ५.०० पूर्वी	प्रतिकात्मक ताबा
२	सोनाराम मोतीजी कुमावत (कर्जदार) कांताबेन सोनाराम कुमावत (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएमएआर०००००१३५३४८५/ एलएचएमएआर०००००१३५३९९३	फ्लॅट क्र. १३०७, १३ वा मजला, सी विंग, बिल्डींग सिग्नेट, सीटीएस क्र. ८२४ (भाग), सीटीएस क्र. ८२१ (भाग), सीटीएस क्र. ८२५ (भाग), गाव मालाड, तालूका बोरिवली, मालाड पूर्व, मुंबई ४०० ०९७.	रु. १,१३, ७७,७५६/- ०७ एप्रिल, २०२५	रु. १,४४,९५, ४००/- रु. १४,४९, ५४०/-	०७ मे, २०२५ रोजी ११.०० ते ३.००	१४ मे, २०२५ रोजी २.०० ते ३.००	१३ मे, २०२५ रोजी ५.०० पूर्वी	प्रतिकात्मक ताबा
३	भिगारदिया हर्षदभाई बटुकभाई (कर्जदार) भिगारदिया हंसाबेन बटुकभाई (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएमएआर०००००१५९०८३६/ एलएचएमएआर०००००१५९०९५१	फ्लॅट धारक क्र. ६०१, ६ वा मजला, बिल्डींग थ्रॉफ विला म्हणून ज्ञात, सर्व्हे क्र. १५५७, गिरगाव विभाग, नोंदणीकरण जिल्हा व उप जिल्हा मुंबई शहर येथील दम्मार लेन, गामदेवी, मुंबई ४०० ००७ येथील.	रु. २,३९, ९१,९४८/- ०७ एप्रिल, २०२५	रु. २,३५, ७१,०००/- रु. २३,५७, १००/-	०७ मे, २०२५ रोजी ११.०० ते ३.००	१४ मे, २०२५ रोजी २.०० ते ३.००	१३ मे, २०२५ रोजी ५.०० पूर्वी	प्रतिकात्मक ताबा
४	श्यामसुंदर रामचरण सोनी (कर्जदार) साधना श्याम सुंदर सोनी (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एनएचएमयूएम०००००८४३१४२, एनएचएमयूएम०००००१२७७९५३/ एनएचएमयूएम०००००८४३१४१/ एनएचएमयूएम०००००१२५७७९९	फ्लॅट क्र. ३८, २ रा मजला, विंग क्र. बी-३७, बिल्डींग क्र. ९, सेक्टर २, इंद्रा प्रस्थ को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि., बी/३६-३७, आनंद नगर, दहिसर पूर्व, मुंबई ४०० ०६८.	रु. ८३,४३, ६८६/- ०७ एप्रिल, २०२५	रु. ६१, २३,६००/- रु. ६,१२, ३६०/-	२२ एप्रिल, २०२५ रोजी ११.०० ते ३.००	२९ एप्रिल, २०२५ रोजी २.०० ते ३.००	२८ एप्रिल, २०२५ रोजी ५.०० पूर्वी	प्रतिकात्मक ताबा

ऑनलाइन लिलाव वेबसाइट URL Link-http//BidDeal.in वर आमची लिलाव एजन्सी ग्लोब टेक मार्फत आयोजित केला आहे. गहाणवटदार/ सूचना याद्वारे वरील अनुसूची अनुसार दि. १३ मे, २०२५ रोजी/२८ एप्रिल, २०२५ रोजी ५.०० पूर्वी त्यावरील व्याज यांच्यासह रक्कमेचे प्रदान करावे.

प्रस्तावित बोलीदार यांनी इसारा रक्कम ठेव इरठे आरटीजीएस/ डिमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई) आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड वरील पत्यावर येथे दि. १३ मे, २०२५/ २८ एप्रिल, २०२५ रोजी ४.०० पूर्वी करावे. प्रस्तावित बोलीदारांनी कृपया स्वाक्षरीकृत प्रत नोंदणीकृत स्वरूपात व बोली अटी व शर्तींवर आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड वरील निर्देशित शाखा पत्ता येथे दि. १३ मे, २०२५ /२८ एप्रिल, २०२५ रोजी ५.०० पूर्वी सादर करावी व इसारा रक्कम ठेव डिमांड ड्राफ्ट (डीडी) राष्ट्रीय/ अनुसूचीत बँक मार्फत आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड – लिलाव मार्फत वरील निर्देशित पत्यावर येथे प्रदान करावे.

कोणत्याही पुढील स्पष्टीकरणाकरिता कृपया लिलावाच्या अटी व शर्ती पाहाव्या व निविदेचे सादरीकरण कृपया आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांना ९९२०८०७३०० वा आमच्या सेल्स व मार्केटिंग पार्टनर एनईएक्सझेन सल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड वर संपर्क साधावा.

प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे कोणतेही कारण न देता सर्व बोली रद्द करण्याचा अधिकार राखून आहे.

पुढील विक्रीच्या अटी व शर्तींकरिता कृपया http://www.icicihfc.com ला भेट द्यावी.

दि. ११ एप्रिल २०२५
ठिकाण : महाराष्ट्र

प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड
सीआयएन क्रमांक : U65922MH1999PLC120106